दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक ८५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.१८ जून २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# रेवदंडा समुद्रात बार्ज बुडाली; १६ खलाशांना वाचविण्यात यश

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**
**रायगड जिल्ह्यात मुसळधार पावसाने जोर धरला आहे. अशातच जून महिन्यात सागरी मासेमारी बंद असल्याने अनेक बोटी किनाऱ्यावर लागल्या आहेत, मात्र मालवाहू बार्ज आजही समुद्रात दिसतायेत. मुंबईतून जेएसडब्ल्यू साळाव येथे माल घेऊन निघालेली बार्ज रेवदंडा खाडीमध्ये बुडाल्याची घटना घडली आहे. या बार्जमधील १६ खलाशांना वाचविण्यात भारतीय तटरक्षक दलाला यश आले आहे.**



'एम.व्ही. मंगलम' ही बार्ज मुंबई येथून जेएसडब्ल्यू कंपनीचा सीएलओ हा कार्गो घेऊन जेएसडब्ल्यू साळाव येथे येत होती. परंतु रेवदंडा खाडीमध्ये कोर्लई किल्ल्याजवळ समुद्रात या बार्जमध्ये पाणी भरण्यास सुरुवात झाली. याबाबत बार्जमधील खलाशांनी कंपनीला कळविले. घटनेची माहिती मिळाल्यानंतर मुरुड येथील भारतीय तटरक्षक दलाचे जवान, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, पोलीस, महसूल विभागाच्या कर्मचार्यांसह जेएसडब्ल्यू कंपनीचे कर्मचारी घटनास्थळी तातडीने दाखल झाले आणि बचावकार्याला सुरुवात झाली. या दुर्घटनेत जिल्हाधिकारी निधी चौधरी, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, आपत्ती व्यवस्थापन टीमने महत्वपूर्ण भूमिका बजावत मदतीसाठी तात्काळ आवश्यक ती ती मदत घटनास्थळी दाखल केली. या बार्जवर १६ खलाशी होते. यापैकी ३ खलाशांना बोटीने वाचविण्यात आले होते. तर उर्वरित १३ खलाशांना हेलिकॉप्टरच्या मदतीने सुखरुप बाहेर काढण्यात यश आले असल्याची माहिती प्रादेशिक बंदर अधिकारी कॅप्टन लेपांडे यांनी दिली आहे.

बचावलेल्या खलाशांमध्ये कॅप्टन सुदाम देवनाथ, सिरा राजू, मंतव्य राज, संतोष कुमार कटरी, एसके मुस्लर रहमान, मयांक तांडेल, अमित निशाद, मोहम्मद सरफराज, पवन कुमार गुप्ता, मोहम्मद कैफ, समीर विश्वकर्मा, राकेश कुमार गुप्ता, सफात मोहम्मद, मनोज कुमार जैस्वाल, पंकज कुमार पटेल, मिजान एसके यांचा समावेश आहे.

> तब्बल १७ तास खलाशी बार्जवरच अडकून पडले होते. बचाव कार्यासाठी भारतीय तटरक्षक दलाचे दोन हेलीकॉप्टर, बोटी बचाव कार्यात पुढे होत्या. बार्जवरील १३ खलाशांना हेलीकॉप्टरच्या, तर तीन खलाशांना बोटीच्या सहायाने बाहेर काढण्यात आले.

# रोहा-मुरुड रस्त्यावर दरड कोसळली



**दै.रायगड नगरी । रोहा**
बुधवार पासून तालुक्यात जोरदारपणे पाऊस सुरू आहे. दरम्यान रोहा मुरुडला जोडणारा सर्वाधिक जवळचा मार्ग असलेल्या केळघर मार्गे मुरुड रस्त्यावर कवाळटे येथे दरड कोसळल्याने हा रस्ता आता वाहतुकीसाठी बंद झाला होता. तो दुपारी पूर्ववत झाला.

या रस्त्याच्या मधोमध मोठमोठ्या दगडी साचल्याने रस्ता पूर्ण बंद झाला. रस्त्यावर दगड, मातीसह मोठ मोठी झाडे उलमलून पडली आहेत. येथील सामजिक कार्यकर्ते महेश वरक, चंद्रकांत जाधव, व अन्य नागरिकांनी मार्ग मोकळा करण्याचा प्रयत्न केला. परंतु दगडी मोठया असल्याने त्यांचे प्रयत्न असफल झाले आहेत. गेले काही वर्ष सातत्याने या मार्गावर दरड कोसळण्याच्या घटना घडत आहेत. गुरूवारी पहाटे या भागात दरडी कोसळण्यास सुरवात झाली, गेले दोन दिवस पडत असलेल्या मुसळधार पावसाने येथील डोंगर खचत गेला आणि पहाटे मोठ मोठे दगड झाडे रस्त्यावर आली. कोणतेही वाहन जात नसल्यानें तसेच या वेळी हा भाग निर्मनुष्य आल्याने कोणतेही जीवित हानी झाली नाहीं, परंतु रोहा मुरुड या दोन तालुक्यामधील दळण वळणाचा सर्वात जवळचा मार्ग बंद झाला आहे. दुपारी सार्वजनिक बांधकाम खात्याने दरड हटवून मार्ग पूर्ववत सुरू केला.

# सिडकोने घेतलेले सेवा शुल्क महापालिका करणार परत

## आयुक्तांच्या ग्वाहीमुळे नागरिकांना मिळणार दिलासा

**दै.रायगड नगरी । पनवेल**
**सिडको हद्दीतील नागरिकांकडून सिडकोने घेतलेले सेवा शुल्क परत करण्याच्या ठरावाची तातडीने अंमलबजावणी करावी त्याबाबत ठोस भूमिका घ्यावी अशी मागणी महापौर डॉक्टर कविता चौतमोल आणि सभागृह नेते परेश ठाकुर यांचे नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने गुरुवारी महापालिका आयुक्तांकडे केली असता सिडको वसाहतीतील नागरिकांच्या मालमत्ताकरातून सिडकोने घेतलेले सेवा शुल्क लवकरात लवकर परत करण्यात येईल असे ठाम आश्वासन आयुक्तांनी दिल्याने दुहेरी करातून सिडको वसाहतीतील नागरिकांना दिलासा मिळणार आहे.**



महापौर डॉक्टर कविता चौतमोल आणि सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या नगरेसेवकांनी महापालिका आयुक्त सुधाकर देशमुख यांची गुरुवार ( दि. १७ ) रोजी महापालिकेत भेट घेतली यावेळी स्थायी समिति अध्यक्ष संतोष शेट्टी, प्रभाग समिती अध्यक्षा सुशीला घरत, हेमलता म्हात्रे, अनीता पाटील, समीर ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, नितिन पाटील, तेजस कांडपिळे, अजय बहिरा, डॉक्टर अरुणकुमार भगत, बबन मुकादम, हरेश केणी, अमर पाटील, विकास घरत, मुकीद काझी, नगरसेविका चारुशीला घरत, सीताताई पाटील, वृषाली वाघमारे, राजश्री वावेकर, माजी उपनगराध्यक्ष संदीप पाटील व भाजपचे खारघर अध्यक्ष ब्रिजेश पटेल उपस्थित होते.

पनवेल महापालिका ऑक्टोंबर २०१६मध्ये स्थापन झाली. यावेळी पनवेल महानगरपालिकेमध्ये ग्रामीण भाग आणि सिडको वसाहतीचा समावेश करण्यात आला. त्यावेळी सिडकोकडून या वसाहतीमध्ये पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी मालमत्ताधारकांकडून सेवा शुल्क आकारण्यात येत होते. याशिवाय महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२७ (१) (अ) नुसार सिडको वसाहती मधील मालमत्ताधारकांना मालमत्ता कराच्या नोटिसा बजावल्या आहेत.

एकाच गोष्टीसाठी दोन शासकीय संस्थांनी कर आकारणी करणे अन्याकारक आहे. या अन्यायाच्या विरोधात सत्ताधारी भारतीय जनता पार्टीच्या सर्व नगरसेवकांनी दिनांक ६ एप्रिल २०२१ रोजी झालेल्या महासभेमध्ये मालमत्ता कराची आकारणी दिनांक १ एप्रिल २०२१ पासून करावी तथापि, नियमानुसार शक्य नसल्यास सिडकोने नागरिकांकडून वसुल केलेला सेवा शुल्क मालमत्ता करातून वगळून तो नागरिकांना परत करण्यात यावा. तसेच आवश्यकता वाटल्यास त्यासाठी शासनाची परवानगी घेण्याकरता तसा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते मंजूर केलेला आहे. परंतु या ठरावावर अद्यापही कोणतीही अंमलबजावणी झालेली असल्याचे दिसून येत नाही.

सिडकोकडून सेवा शुल्क घेऊन पुरवण्यात येणाऱ्या गटार, सिवरेज लाईन, रस्ते, कचरा आणि बिल्डिंगची गळती इत्यादि पायाभूत सुविधांचा दर्जा चांगला नाही. या वसाहतीमध्ये भाजी मार्केट, मच्छी मार्केट आणि रोज बाजार यासारखी मार्केट दिलेली नाहीत. रस्ते आहेत पण त्यांची दुरवस्था ..../२

> सिडको वसाहतीतील नागरिकांना दुहेरी कराचा आर्थिक भुर्दंड व मनस्ताप सहन करायला लागू नये यासाठी सिडकोने वसूल केलेले सेवा शुल्क त्यांना परत करावे या मागणीसाठी आज आयुक्तांची भेट घेऊन या सेवा शुल्काचा लवकरात लवकर परतावा द्यावा अन्यथा भाजप आणि आरपीआयचे सर्व नगरसेवक राजीनामा देतील, असे आम्ही सांगितले.
> **परेश ठाकूर, सभागृह नेते, पमपा, पनवेल**

# संक्षिप्त...

## रायगडात आज कोरोनाचे ५९७ नवे रुग्ण; ११ मृत्यू

**दै.रायगड नगरी । अलिबाग**
रायगड जिल्ह्यात आज (१७ जून) कोरोनाच्या ५९७ नव्या रुग्णांची नोंद झाली असून ११ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तर दिवसभरात ५४४ रुग्णांनी कोरोनावर यशस्वी मात केली आहे.

आज पनवेल शहरात ७०, पनवेल ग्रामीणमध्ये ५१, अलिबागमध्ये १०३, खालापूरमध्ये २९, उरणमध्ये ४६, पेणमध्ये ७७, महाडमध्ये ५४, कर्जतमध्ये १८, रोह्यात ४१, मुरुडमध्ये २०, माणगावमध्ये ५२, म्हसळ्यात ६, सुधागडमध्ये ७, पोलादपूरमध्ये ६, श्रीवर्धनमध्ये १६, तळामध्ये १ रुग्णाची कोरोना चाचणी पॉझिटीव्ह आली आहे.

आजअखेर रायगड जिल्ह्यातील एकूण कोरोना बाधित रुग्णांची संख्या १ लाख ४० हजार ४३४ झाली आहे. यापैकी १ लाख ३१ हजार २६५ रुग्ण कोरोनातून बरे झाले आहेत.

तर मृतांचा आकडा ३ हजार ४२० वर गेला आहे. सद्यस्थितीत ५ हजार ७४९ सक्रीय रुग्ण कोरोनावर उपचार घेत आहेत.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**
पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.
संपर्क : ९८२०३५५३४६

**ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे**
पवन अपार्टमेंट येथील लोखंडीपाडा, नवीन जिल्हा सत्र न्यायालयासमोरील जागा बँकेच्या ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे.
संपर्क : ९२२३३४५२४९

# पुढील दिशा २१ जूनला ठरणार; संभाजीराजेंची भूमिका

**दै.रायगड नगरी । मुंबई**
मराठा समाजाच्या मागण्यांवर विचार करण्यासाठी राज्य सरकारने समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, तसेच सरकारने सकारात्मक विचार करण्याचे ठोस आश्वासन दिल्यानंतर मराठा मूक आंदोलनाचे प्रणेते खासदार संभाजीराजे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. राज्य शासनाने मराठा समाजाच्या मागण्या मान्य केल्या असल्या तरी देखील आमची सरकारशी अजूनही चर्चा सुरुच आहे. त्यामुळे आम्ही आमचे मूक आंदोलन मागे घेतलेले नाही. येत्या २१ तारखेला नाशिक येथे राज्यातील सर्व मूक आंदोलन समन्वयकांची बैठक होत असून त्या दिवशी आंदोलनाची पुढील दिशा ठरवू असे संभाजीराजे यांनी स्पष्ट केले आहे.

येत्या २१ जून या दिवशी नाशिक येथे मराठा समाजाचे मूक आंदोलन ठरलेले आहे. २१ तारखेला आम्ही नाशिकला जाणार आहोत. राज्य सरकारने आमच्या सर्व मागण्या मान्य केल्या असल्या तरी आमची सरकारशी अजूनही चर्चा सुरूच आहे. हे पाहता आम्ही आमचे आंदोलन मागे घेतलेले नाही. २१ तारखेला नाशिकमध्ये जाण्याचे ठरल्याप्रमाणे आम्ही राज्यातील सर्व समन्वयक तेथे भेटणार आहोत. तेथे चर्चा करून आपल्या आंदोलनाची पुढील दिशा नेमकी कशी असेल त्यावर आम्ही निर्णय घेणार असल्याचे खासदार संभाजीराजे यांनी म्हटले आहे.

# रायगड येथे उभारणार बल्क ड्रग पार्क : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

## ३०००० कोटींची गुंतवणूक आणि अंदाजे ७५००० लोकांना रोजगार निर्माण करणारा प्रकल्प



**दै.रायगड नगरी । मुंबई**
देशातील औषधांच्या पुरवठ्याची क्षमता असलेला राज्यातील महत्वाकांक्षी रायगड जिल्ह्यातील प्रस्तावित बल्क ड्रग पार्कची उभारणी करतांना स्थानिकांना विश्वासात घेऊन काम करावे अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिल्या.

रायगड जिल्ह्यातील मुरुड आणि रोहा या तालुक्यातील १७ गावांच्या जमिनीवर हा प्रकल्प प्रस्तावित आहे. कोणत्याही गावाचे स्थलांतर होणार नाही. स्थानिकांना प्राधान्याने रोजगार उपलब्ध करून देणारा ३०००० कोटींच्या गुंतवणूकीचा आणि अंदाजे ७५००० लोकांना रोजगार निर्माण करणारा हा प्रकल्प असणार आहे. यासंदर्भातील सादरिकरण उद्योगविभागातर्फे आज मुख्यमंत्र्यांसमोर करण्यात आले.

या वेळी उद्योग मंत्री सुभाष देसाई, उद्योग राज्यमंत्री कु.अदिती तटकरे, खासदार सुनिल तटकरे, आमदार महेंद्र दळवी, उद्योग विभागाचे अप्पर मुख्य सचिव बलदेव सिंग, एम आय डी सी चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी अन्बलगन, रायगड जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांचेसह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले, याठिकाणी उभारल्या जाणा-या प्रकल्पांमध्ये भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध व्हावा. या रोजगारासाठी लागणारी कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात यावी. प्रत्यक्ष जमीनीवरचे सर्वेक्षण व्हावे, शक्य असेल तिथे बागायतीचे संरक्षण व्हावे आणि स्थानिकांना सर्वोत्तम मोबदला मिळेल यासाठीचा सर्वंकष आराखडा तयार करून स्थानिकांशी चर्चा करून या प्रकल्पाची आखणी करावी असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

भारतातील औषध निर्माण उद्यानांचा विकास या अंतर्गत हा प्रकल्प उभा रहावा यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे, असे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी सांगितले. भूसंपादनाच्या मोबदल्या व्यतिरिक्त पीएपीसाठी १०% ..../२

## मच्छीमारांच्या व्यवसायावर परिणाम नाही : आदिती तटकरे

**प्रक्रिया केलेले सांडपाणी खोल समुद्रात १० कि. मी आत सोडण्यात येणार असल्याने स्थानिक मच्छीमारांच्या व्यवसायावर कोणताही परिणाम होणार नाही. तसेच औषध निर्माण उद्यानामध्ये स्थापन कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व फंडातुन गावातील नागरी सुविधांचे बळकटीकरण (Strengthening of Civil Amenities) व स्थानिकांसाठी कल्याणकारी (Welfare) योजनांची अंमलबजावणी करण्यात येईल, अशी माहिती उद्योग राज्यमंत्री तटकरे यांनी यावेळी दिली.**

# एस.एम.देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांचे शरद पवारांना साकडे



**दै.रायगड नगरी । मुंबई**
मराठी पत्रकार परिषद, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघ, टीव्हीजेए आणि बीयुजे या संघटनांच्या एका शिष्टमंडळाने एस.एम.देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आज शरद पवार यांची त्यांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक या निवासस्थानी भेट घेऊन पत्रकारांना फ्रन्टलाईन वर्कर म्हणून मान्यता मिळावी अशी मागणी केली.

राज्यात १४२ पत्रकार कोरोनाचे शिकार ठरले असताना देखील सरकार पत्रकारांच्या विषयाकडे पूर्णता दुर्लक्ष करीत असल्याची बाब ही शिष्टमंडळाने शरद पवार यांच्या निदर्शनास आणून दिली. पत्रकार पेन्शन, पत्रकारांवरील हल्ले, पत्रकार आरोग्य योजना, अधिस्वीकृती समितीचे पुनर्गठण, मुंबईतील पत्रकारांना लोकलमधून प्रवास करण्याची सुविधा आदि विषय देखील शिष्टमंडळाने पवार यांच्या कानावर घातले आणि पत्रकारांच्या विविध प्रश्नांबाबत आपण लक्ष घालावे अशी विनंती त्यांना केली. पत्रकारांच्या प्रश्नांबाबत आपण लक्ष घालू असे आश्वासन शरद पवार यांनी शिष्टमंडळाला दिले. शिष्टमंडळात एस.एम.देशमुख, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष मंदार पारकर, टीव्हीजेएचे अध्यक्ष विनोद जगदाळे, बीयुजेचे जॉइन्ट सेक्रेटरी सुरजसिंह ठाकूर, आदि सहभागी झाले होते. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष शरद पाबळे दीपक कैतके उपस्थित होते. पत्रकारांच्या वरील संघटनांनी यापुर्वी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेऊन त्यांच्याकडेही पत्रकारांना फ़्न्टलाईन वर्कर म्हणून जाहीर करण्याची विनंती केली आहे.

# अविवेकाची काजळी

केंद्र सरकारने आणलेल्या नागरिकत्व सुधारणा कायद्याला देशभरात ठिकठिकाणी विरोध झाला. असाच विरोध गेल्या वर्षी ईशान्य दिल्लीत झाला; तेव्हा हिंसाचार उसळून काही जणांचे प्राण गेले होते. तेव्हा चिथावणीखोर भाषणे आणि कारवाया केल्याबद्दल दिल्ली पोलिसांनी अनेकांना अटक केली होती. मात्र, त्यातील देवांगना, नताशा आणि आसिफ या तेव्हापासून अटकेत असणाऱ्या दोन तरुणी आणि एका तरुणीला दिल्ली उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. हा निकाल देताना न्या. सिद्धार्थ मृदुल आणि न्या. अनूप जयराम भंबानी यांच्या खंडपीठाने दिल्ली पोलिसांचे सूत्रसंचालन करणाऱ्या केंद्रीय गृह खात्याचे तसेच केंद्र सरकारचे जे कान टोचले आहेत, ते 'बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायदा' म्हणजे 'यूएपीए'च्या सीमा आणि मर्यादा दाखवून देणारे आहेत. गेल्या काही दिवसांत सरकारच्या विरोधात होणारी निदर्शने, आंदोलने किंवा निषेध आणि देशद्रोही व दहशतवादी कारवाया यांच्यातील सीमारेषा धूसर करण्याचे प्रयत्न चालू आहेत. लोक आंदोलनांमध्ये देशविरोधी किंवा विघातक शक्ती घुसतात आणि अशा आंदोलनांचा कब्जा घेतात अथवा वापर करून घेतात, हा सरकारचा नेहेमीचा बचाव असतो. त्यात काही प्रमाणात तथ्य आहे. याचे कारण, गेल्या काही वर्षांमध्ये विशेषत: नक्षलवाद्यांनी वरवर निरुपद्रवी दिसणाऱ्या किंवा कला सादर करणाऱ्या पण देशविघातक कृत्ये करणाऱ्या अनेक पथकांना जन्म दिला आहे. जगातील अनेक देशांच्या गुप्तचर यंत्रणा भारतात अशांतता माजविण्याचा प्रयत्न सदोदित करीत असतात, हा तर इंदिरापर्वापासून चालत आलेला अनुभव आहे. त्यामुळेच, दहशतवाद विरोधी कायदा टाडा, पोटा आणि सध्या यूएपीए असे नवनवे अवतार घेत अधिक कडक व व्यापक होत गेला आहे. पण हा कायदा कुठे आणि कोणत्या कृत्यांसाठी वापरायचा, याचा विवेकच अलीकडे सुटत चालला आहे. दिल्ली पोलिसांनी या मुलांना हा कायदा लावताना स्वत:च शौर्य दाखविले की त्यांना आदेश देणाऱ्या गृह खात्याला आणि राजकीय नेत्यांना खूष केले, हा प्रश्न होता. या प्रश्नाचे नि:संदिग्ध उत्तर देताना न्यायालयाने देशविरोधी दहशतवादी कृत्ये आणि इतर गुन्हेगारी कृत्ये यांच्यातला फरक स्पष्टपणे सांगितला आहे. उद्या केंद्र सरकारने या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले तरी दिल्ली उच्च न्यायालयाने इतर सर्वसाधारण गुन्हे आणि राष्ट्रद्रोह यांच्यातला जो फरक अधोरेखित केला आहे, त्याचे भान यापुढे केवळ दिल्ली पोलिसांनीच नव्हे तर देशातल्या सगळ्यांच पोलिस दलांनी बाळगण्याची गरज आहे. कितीही नृशंस गुन्हा असला आणि तो जर भारतीय दंडविधानाच्या कलमांखाली मोडत असेल तर त्याला केवळ 'गंभीर गुन्हा' म्हणून यूएपीए लावता येणार नाही, हे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. यूएपीए या कायद्यात देशात बंडाळी माजविणे, सरकारच्या विरोधात सशस्त्र युद्ध पुकारणे, राज्यव्यवस्था उलथवून टाकण्यासाठी कट, कारस्थाने किंवा दहशतवादी कृत्ये यांचा अवलंब करणे अशा गुन्ह्यांचा समावेश आहे. हे अत्यंत गंभीर गुन्हे असल्यानेच अशा संशयितांना जामीनही मिळू नये, अशी तरतूद आहे. नेमकी तीच तरतूद वापरून या तीन संशयितांना गेले वर्षभर तुरुंगात राहावे लागले. त्यांना जामीन मिळाला, याचा अर्थ ते निर्दोष सुटले, असा नाही. मात्र, आता पोलिसांना त्यांच्यावरील आरोप भारतीय दंडविधानातील तरतुदींचा वापर करून न्यायालयात सिद्ध करावे लागतील. अनेक वर्षांपूर्वी महाराष्ट्रात 'टाडा' हा तेव्हाचा दहशतवाद विरोधी कायदा भूमाफिया किंवा गुंडांना लावण्याचे सत्र सुरू झाले होते. तेव्हाही, हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयासमोर आला होता. आता दिल्ली उच्च न्यायालयाने 'प्रत्येक दहशतवादी हा गुन्हेगार असतो; पण प्रत्येक गुन्हेगार हा दहशतवादी नसतो' अशा स्पष्ट शब्दांत या तिघांना यूएपीए लावण्याचा पोलिसांचा निर्णय रद्दबातल केला आहे. खंडपीठाने दहशतवाद आणि इतर गुन्हेगारी यांच्यातील फरक स्पष्ट करताना इतरही अनेक मुद्दे मांडले आहेत. त्या साऱ्यांचा आणि या निकालाचा केंद्र सरकार आणि पोलिस खात्याला एकच संदेश आहे आणि तो म्हणजे, कोणतेही आंदोलन चिरडून टाकण्यासाठी कायद्यांचा गैरवापर करू नका. मागे एका निकालात न्यायव्यवस्थेने केवळ आक्षेपार्ह वाटणारे साहित्य किंवा पुस्तके बाळगणे, हा देशद्रोह कसा ठरतो? असा प्रश्न केला होता. आत्ताही न्यायालयाने हा कायदा वापरताना 'या कृत्यांनी देशाच्या संरक्षणाला गंभीर धोका उत्पन्न झाला आहे का?' असा प्रश्न विचारला गेला पाहिजे, असे म्हटले आहे. ते उचितच आहे. देशद्रोह किंवा दहशतवादी कारवायांचे कायदे संयमाने न वापरल्यास त्यांचे महत्त्व कमी होऊ शकते, हे सरकारने विसरता कामा नये. केंद्र सरकारने दिल्ली उच्च न्यायालयाचा हा निकाल वाचून तरी ही अविवेकाची काजळी झाडून टाकायला हवी. निदर्शने करणाऱ्या विद्यार्थ्यांना दहशतवादी ठरविण्यात राज्यसंस्थेचे काहीच शौर्य नाही; ते खऱ्या, गंभीर दहशतवादापासून देशाला मुक्त करण्यात आहे.

# कोरोना रुग्णांची विभागवार यादी जाहीर व्हावी : स्थानिकांची मागणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉक डाऊन मध्ये पर्यटकांना बंदी घालण्यात आलेली असतांना देखील माथेरान सारख्या दुर्गम भागात दरदिवशी तीन ते चार जण कोरोना पॉजीटिव्ह आढळून येत आहेत त्यामुळे एकीकडे पर्यटन व्यवसाय बंद केल्यामुळे लवकरच इथे पर्यटकांना प्रवेश देण्यात यावा जेणेकरून पर्यटन व्यवसाय सुरू होईल आणि सर्वांनाच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील अशी मागणी सातत्याने होत असताना नागरिकांच्याच बेजबाबदार पणामुळे कोरोना रुग्ण आढळून येत आहेत. केवळ पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या सर्वांना माथेरानची ही टाळेबंदी लवकरात लवकर उठून रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी वरिष्ठ पातळीवरून प्रयत्न सुरू आहेत. परंतु येथील नागरिक कोरोना महामारी बाबतीत गांभीर्याने घेत नाहीत.मागील लॉक डाऊन काळात अनेकांना या महामारी मुळे आपले प्राण गमवावे लागले होते. त्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी खबरदारी घेणे आवश्यक आहे.त्यातच सध्या लहान मुलांना सुध्दा या आजाराने ग्रासलेले दिसत आहे.

दिवसरात्र पोलीस प्रशासन आ–पले कर्तव्य चोखपणे बजावत आहेत तर नगरपरिषदेच्या दवाखान्यात कार्यरत असलेला संपूर्ण वैद्यकीय अधिकारी,कर्मचारी वर्ग रुग्णांना सेवा उपलब्ध करून देत आहेत. मागील वेळेस २ सप्टेंबरला माथेरान अनलॉक केल्यावर मोठ्या प्रमाणावर पर्यटन व्यवसाय बहरला होता.आताही हे पर्यटनस्थळ अनलॉक केल्यानंतर सर्वसामान्य लोकांपासून हॉटेल,लॉज धारकांना,श्रमिक हातरीक्षा चालक, अश्वपालकांना रोजगार निर्मिती होणार आहे यात शंका नाही.सध्या माथेरान मध्ये जवळपास तीसच्या आसपास कोरोना पॉजीटिव्ह रुग्णांची संख्या आहे. ज्या व्यक्ती या आजाराने बाधित झालेल्या आहेत त्यांच्या कुटुंबातील सदस्य बिनधास्तपणे गावात वावरताना दिसतात. त्यांना अन्य लोकांच्या जीवना बाबतीत काहीच स्वारस्य नसल्याचे दिसून येते. लॉक डाऊन मुळे सर्वांचीच आर्थिक सुबत्ता खुंटलेली असताना यदाकदाचित कुणाच्या घरात या आजाराने उग्र रूप धारण केले तर वैद्यकीय उपचारासाठी काय करणार ही सुद्धा एक गहण समस्या निर्माण झाली आहे.त्यामुळे विनाकारण गावात फिरणाऱ्याना शासन करणे गरजेचे आहे. जे रुग्ण कोरोना बाधित आहेत अशा रुग्णांची यादी नगरपरिषदेने जाहीर करताना विभागवार आणि ज्या ठिकाणी रुग्ण रहात आहेत त्या जागेचे नाव जाहीर केल्यास अन्य नागरिक यामुळे आपला बचाव करू शकतात. आणि यापुढे ज्या व्यक्ती कामाशिवाय घराबाहेर पडतील अशा मंडळींकडून दंड वसूल करण्यात यावा यामुळे मोकाट फिरणाऱ्या व्यक्तींना एकप्रकारे चाप बसून या महामारीवर निश्चितच आळा बसेल असेही बोलले जात आहे.

नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी वे–ळोवेळी नागरिकांना सूचित केले आहे की सर्वांनी आपली आणि आपल्या कुटुंबाची काळजी घ्यावी शासनाच्या नियमांचे पालन करावे आपल्याला कोरोना या गावातूनच हद्दपार करावयाचा आहे, इथले पर्यटन लवकरच सुरू करण्यासाठी आमचा प्रयत्न आहे, तर माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी सुध्दा संबंधीत अधिकारी वर्ग त्याचप्रमाणे वरिष्ठ राजकीय पक्षांकडे माथेरान अनलॉक करण्यात यावे अन्यथा इथल्या नागरिकांना वेळप्रसंगी आत्महत्या करण्याची वेळ येऊ शकते यासाठी पर्यटन सुरू झाले पाहिजे याकामी प्रयत्न केले आहेत. नुकताच भाजपच्या असंख्य कार्यकर्त्यांनी सुध्दा जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन माथेरान सुरू करण्यात यावे असे निवेदन सादर केले आहे.

# पद्मश्री डॉ.अनुराधा पौडवाल यांच्यातर्फे पनवेल महापालिकेस ऑक्सिजन कॉन्सट्रेटर

## सुर्योदया फाऊंडेशनतर्फे पालिकेस ऑक्सिजन मशिन्स सुपूर्द

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जगप्रसिद्ध गायिका पद्मश्री डॉ. अनुराधा पौडवाल यांच्या सुर्योदया फाउंडेशनतर्फे पनवेल महापालिकेस दोन ऑक्सिजन कॉन्सनट्रेटर मशिन्स भेट स्वरूपात देण्यात आल्या. पालिकेच्या आरोग्य विभागाला ऑक्सिजन मशिन्स सुपूर्द करून अनुराधा पौडवाल यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे.



यावेळी पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ.कविता चौतमोल, आयुक्त सुधाकर देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, सहाय्यक आयुक्त धैर्यशील जाधव, सुर्योदया फाउंडेशनचे सेक्रेटरी विवेक मातोडे, वैद्यकीय अधिकारी डॉ.पूनम जाधव, श्रीकांत म्हात्रे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आपत्कालीन परिस्थितीत शासनाला नेहमीच मदतीचा हात पुढे करत १९८५ पासून सुर्योदया फाउंडेशन सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून कार्यरत आहे. कोरोनाच्या महाभयंकर काळात मोठ्या प्रमाणात रुग्णांना ऑक्सिजनचा तुटवडा भासला. त्यामुळे ऑक्सिजन अभावी असंख्य रुग्णांना आपले प्राण गमवावे लागले. ही अडचण लक्षात घेऊन सर्वोदया फाउंडेशनच्या सर्वेसर्वा तथा जगप्रसिध्द गायिका पद्मश्री डॉ. अनुराधा पौडवाल यांच्या माध्यमातून ठिकठिकाणी वैद्यकीय उपकरणे भेट स्वरूपात दिली जात आहेत. आज (गुरुवार दि.१७ जून) पनवेल महापालिकेस ५ लिटर क्षमतेचे दोन ऑक्सिजन कॉन्सनट्रेटर सुपूर्द करण्यात आले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सिडकोने घेतलेले सेवा शुल्क महापालिका करणार परत

झाल्यावर कधीतरी चार–पाच वर्षांनी त्याची दुरूस्ती केली जाते. भविष्यात वाढणार्यार लोकसंख्येचा विचार न करता पूर्वीच्या लोकसंख्येवर आधारित कामोठे, कळंबोली, खारघर सारख्या ठिकाणी टाकलेली सिवरेज लाईन आता अपुरी पडत आहे. नवीन पनवेल स्टेशन ते विचुंबेकडे जाणारा रस्ता त्या भागातील नागरीकरण वाढल्याने लहान वाटतो आणि लोकांना वाहतूक कोंडी सहन करावी लागते. सिडकोने सेवा शुल्क घेऊन निकृष्टप्रतीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. कामाची दुरूस्ती करताना अत्यंत संथ गतीने करण्यात येत असल्याने येथील नागरिकांनी आणि लोकप्रतिनिधींनी सातत्याने येथील सुविधा पुरवण्याचे काम सिडको कडून हस्तांतरण करून घेण्याची मागणी केली.

याबाबत सिडकोच्या अधिकाऱ्यांजवळ अनेक वेळा चर्चा करून व आंदोलने करूनही कामे होत नसल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सोबत चर्चा करून पनवेल महानगरपालिका स्थापन करण्याची आवश्यकता असल्याचे ठरले. याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांना कळविण्यात आले आणि महापालिका स्थापन झाली. आता येथील सर्व सेवा महापालिकेकडे हस्तांतरण केल्या जाऊन महापालिकेतर्फे सर्व सेवा सुविधा मिळतील, अशी खात्री नागरिकांना वाटली. मात्र, सिडकोला नागरिकांना सेवासुविधा देण्यात कोणतेही स्वारस्य नसल्याचे दिसून आले. त्यामुळे येथील पायाभूत सुविधांचे हस्तांतरण अजूनही झालेले नाही. मोकळ्या भूखंडासाठी पालिकेने मार्च २०१९ मध्ये ७२ भूखंडांचे पैसे भरूनही सर्व भूखंड अद्याप हस्तांतरित केलेले नाहीत. सिडकोकडून जाणून बुजून उशीर केला जात असल्याचे दिसून येत आहे.

सिडको वसाहतीमधील मालमत्ताधारकांना महापालिकेने सन २०१६ पासूनचा मालमत्ता कर भरावा, अशा नोटिसा नुकत्याच बजावल्या. मागील कालावधीतील सेवाशुल्क सिडकोला भरलेला असताना तो पुन्हा का भरावा, असा प्रश्ननागरिकांना पडला. आम्ही सिडकोला सेवा शुल्क देतो मग पुन्हा महापालिकेलाही तो द्यायचा का ? महापालिका आम्हाला कोणत्याही सुविधा पुरवत नसताना हे शुल्क का भरायचे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या दुहेरी कर पध्दतीबद्दल पनवेलचे नागरिक व भारतीय जनता पक्षाचे लोकप्रतिनिधीमध्ये असंतोष निर्माण झाला व ही न्याय मागणी असल्यामुळे सत्तारूढ भारतीय जनता पक्षाच्या पुढाकाराने ठराव मंजूर करण्यात आला होता. याबाबत अडीच महीन्याचा कालावधी पुर्ण होऊन ही प्रशासनाकडून व सिडकोकडून कोणतीही कार्यवाही झालेली होताना दिसत नाही. त्यामुळे नागरिकांना नाहक आर्थिक भुर्दंड व मनस्ताप सहन करावा लागत आहे.

शिष्टमंडळाने आयुक्तांची भेट घेऊन ठरावाची कार्यवाही तातडीने झाली नाही तर नागरिकांच्या हितासाठी आम्हांला सिडको व महानगरपालिका प्रशासन यांच्या विरोधात आक्रमक भुमिका घ्यावी लागेल, असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला . यावेळी चर्चा करताना आयुक्तांनी सिडकोने वसूल केलेले चार वर्षाचे सेवा शुल्क पनवेल महापालिका सिडको वसाहतीतील नागरिकांना परत देणार आहे. सिडकोकडून १ ऑक्टोबर २०१६ पासून ३१ मार्च २०२१पर्यंत किती सेवा शुल्क वसूल केले आहे याची माहिती मागवण्यात आली असून ती माहिती मिळाल्यावर परतावा देण्यात येईल असे सांगितले.

## रायगड येथे उभारणार बल्क ड्रग पार्क : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

विकसीत भूखंड देण्यात येईल. भूखंडाचा वापर व्यावसायिक, औद्योगिक आणि निवासी वापराकरीता करता येऊ शकेल. त्यामुळे उद्योग / व्यवसायातून तसेच निवासी गाळे बांधून भाड्याने देता येतील व प्रकल्पग्रस्तांना कायम स्वरुपाचे उत्पन्न निर्माण होणार आहे. स्थानिकांच्या कौशल्य विकासासाठी कौशल्य विकास केंद्र निर्माण करण्यात येईल. असेही श्री देसाई यांनी सांगितले.

देशामध्ये औषध निर्माण उद्यानांच्या (बीडीपी) उभारणीस चालना देणे, उद्यानात वसलेल्याऔषध निर्माण विभागांना जागतिक दर्जाच्या सामायिक पायाभूत सुविधा सहजपणे उपलब्ध करून देणे, त्यायोगे औषधनिर्मितीच्या उत्पादनखर्चात लक्षणीय घट होऊन देशातील औषध निर्माण उद्योगाची स्पर्धात्मकता वाढवणे आणि पर्यायाने भारताला औषधनिर्मितीत आत्मनिर्भरता प्राप्त करून देण्यासाठी या प्रकल्पाची अंमलबजावणी भारत सरकारच्या रसायने आणि खते मंत्रालय, औषध निर्माण विभागामार्फत केली जाते. यासाठी रु ३००० कोटी रुपयांचा वित्तीय आराखडा असून या योजनेंतर्गत देशात तीन औषध निर्माण उद्यानांना सहाय्य केले जाणार आहे, सामायिक पायाभूत सुविधांच्या निर्मीतीसाठी अनुदान सहाय्य उपलब्ध करुन दिले जाते. राज्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला असून राज्यात औषध निर्मीती पार्क तयार करण्यासाठी पोषक वातवरण असल्याची माहिती डॉ. अन्बलगन यांनी सादरीकरणादरम्यान दिली.

# सायलेन्सर चोरणारी आंतरराज्यीय टोळी गजाआड

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

नवी मुंबई, पनवेल, कळंबोली, उरण, पिंपरी–चिंचवड या भागात तसेच गुजरात व राजस्थान येथून गाड्यांचे सायलेन्सर चोरणाऱ्या त्रिकुटास स्थानिक अन्वेषण गुन्हे शाखा अलिबागने गजाआड केले आहे.

एप्रिल २०२१ मध्ये वडखळ पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ६५/२०२१ भादवि क.३७९ या गुन्ह्यात तीन मारुती इको गाडीचे सायलेन्सर चोरीला गेले होते. या पूर्वी या प्रकारचे गुन्हे नेरळ, खालापूर, वडखळ, कर्जत आणि पेण या पोलीस ठाण्याच्या हद्दीत देखील घडले आहेत. नमूद गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा रायगड यांच्याकडून करण्यात येत होता. सदर तपासादरम्यान सपोनि धनंजय पोरे व त्यांच्या पथकाला सायलेन्सर चोरी करणारी टोळी कुर्ला मुंबई येथे कार्यरत असल्याचे समजले. त्यावरून नमूद पथकाने कुर्ला येथून आरोपी मिनाज अब्दुल करीम खान, वय २१ वर्षे, सैफ दिलशाद खान, वय २४ वर्षे, आकाश जीतराम शर्मा, वय २२



वर्षे सर्व सध्या रा.कुर्ला मुंबई यांना ताब्यात घेतले. नमूद आरोपींच्या चौकशीत पुणे त्यांनी गुन्ह्याची कबुली देऊन त्यांनी ते गेल्या एक वर्षापासून वेगवेगळ्या भागात अशा प्रकारचे गुन्हे करत असल्याचे सांगितले. अटक आरोपी कडून सन २०२० व २०२१ मधील रायगड जिल्ह्यात मारुती ईको गाडी चे सायलेन्सर चोरीचे खालील प्रमाणे एकूण १० गुन्हे उघडकीस आले असून त्यामध्ये आरोपीने चोरून नेलेले एकूण २४ मारुती इको गाड्यांचे सायलेन्सर असा मिळून ३ लाख ९० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेली मारुती कार जप्त करण्यात आली आहे. सदर आरोपींनी अशाच प्रकारचे गुन्हे नवी मुंबई, पनवेल, कळंबोली, उरण, पिंपरी–चिंचवड या भागात तसेच गुजरात व राजस्थान या ठिकाणी केले आहेत. सदर आरोपींवर वडखळ, पेण, कर्जत, खालापूर, नेरळ या पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल आहेत. सदरची कामगिरी सपोनि धनंजय पोरे, पोहवा अमोल हंबीर, स्वप्नील येरुनकर, सचिन शेलार, पोकॉ अनिल मोरे यांनी केली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस व विशेषतः तळोजा पनवेल महानगरपालिका / सिडको हद्दीतील मौजे : तळोजा II, तालुका : पनवेल, जि.रायगड परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारा कळविण्यात येते की, तळोजा II, तालुका : पनवेल, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांनी विद्यमान मालक १) श्री.शब्बीर अहमद अब्दुल लतीफ पटेल, रा.मु.तळोजे पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड ह्यांच्याकडून कायम खरेदी खताने विकत घेतली आहे. तरी सर्वांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त मिळकतीचे संदर्भात कोणीही, कसल्याही प्रकारचा गहाण, दान, विकसनकरार, बयाणा पावती, बक्षिस, लीन, लीज, विसारपावती, कुलमुखत्यारपत्र, खरेदीखत, कुळ, खंड, अदलाबदलपत्र, साठेकरार, असाईनमेंट, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा व्यवहार वर नमूद व्यक्तींसोबत करू नये तसे केल्यास ते व्यवहार गैर व्यवहार समजले जातील व तो करार आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. कोणाचेही नुकसान होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. परिशिष्ट मिळकतीचे वर्णन : तळोजा II, तालुका : पनवेल, जि.रायगड मे.दुय्यम निबंधक साहेब पनवेल यांचे व पनवेल महानगरपालिका/सिडको हद्दीतील

फाईल क्र.तळोजा II, ५५८ भूखंड क्र.१९, सेक्टर क्र.२०,
क्षेत्र ४०० चौ.मी. ता.पनवेल, जि.रायगड

सदर मिळकतीच्या कायम खरेदी खताच्या संदर्भ हा ह्या जाहीर नोटीसीचा विषय असे.

कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
दिनांक : १६/०६/२०२१

सही/–
**ॲड.श्री.सुधीर एस.म्हात्रे**
**ॲड.कल्याणी सुधीर म्हात्रे**
**ऑफिस नं.०६, तळमजला, त्रिमुर्ती इनक्लेव सोसायटी, सेक्टर ९, कामोठे, पनवेल**
**मो.नं.९६६४०९८३४७/९०८२३३८३१५**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस व विशेषतः तळोजा पनवेल महानगरपालिका / सिडको हद्दीतील मौजे : तळोजा II, तालुका : पनवेल, जि.रायगड परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारा कळविण्यात येते की, तळोजा II, तालुका : पनवेल, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांनी विद्यमान मालक १) कै.अब्दुला अब्दुल लतीफ पटेल मयतचे वारस १/१) श्रीमती.शहनाज अब्दुला पटेल, १/२) श्री.शोएब अब्दुला पटेल, १/३) श्री.शोबमान अब्दुला पटेल, १/४) श्री.सुफियान अब्दुला पटेल, १/५) श्रीमती.सुमैया अब्दुला पटेल सर्व रा.मु.तळोजे पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड ह्यांच्याकडून कायम खरेदी खताने विकत घेतली आहे. तरी सर्वांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त मिळकतीचे संदर्भात कोणीही, कसल्याही प्रकारचा गहाण, दान, विकसनकरार, बयाणा पावती, बक्षिस, लीन, लीज, विसारपावती, कुलमुखत्यारपत्र, खरेदीखत, कुळ, खंड, अदलाबदलपत्र, साठेकरार, असाईनमेंट, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा व्यवहार वर नमूद व्यक्तींसोबत करू नये तसे केल्यास ते व्यवहार गैर व्यवहार समजले जातील व तो करार आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. कोणाचेही नुकसान होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. परिशिष्ट मिळकतीचे वर्णन : तळोजा II, तालुका : पनवेल, जि.रायगड मे.दुय्यम निबंधक साहेब पनवेल यांचे व पनवेल महानगरपालिका/सिडको हद्दीतील

फाईल क्र.तळोजा II, ५५८ भूखंड क्र.९८, सेक्टर क्र.२३,
क्षेत्र ४०० चौ.मी. ता.पनवेल, जि.रायगड

सदर मिळकतीच्या कायम खरेदी खताच्या संदर्भ हा ह्या जाहीर नोटीसीचा विषय असे.

कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
दिनांक : १६/०६/२०२१

सही/–
**ॲड.श्री.सुधीर एस.म्हात्रे**
**ॲड.कल्याणी सुधीर म्हात्रे**
**ऑफिस नं.०६, तळमजला, त्रिमुर्ती इनक्लेव सोसायटी, सेक्टर ९, कामोठे, पनवेल**
**मो.नं.९६६४०९८३४७/९०८२३३८३१५**

Hon'ble Godase Madam
MR. MANGESH CHAVAN
Advocate for Applicants

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D), PANVEL AT PANVEL
MISC. APPLICATION NO 339 OF 2021
Exhibit No.7/D
Next Date : 28/07/2021

**1. SMT. SUNITA SHRIHARI KALSEKAR**
Aged 76 years, Indian Inhabitant, residing at Flat No. A-104, Mahendra Splender, LBS Road, opp. Neptune Magnet Mall, Bhandup, Mumbai 400078
**2.MR.RAJESH SHRIHARI KALSEKAR**
Aged 50 years, Indian Inhabitant, residing at Flat No. A-104, Mahendra Splender, LBS Road, opp. Neptune Magnet Mall, Bhandup, Mumbai 400078
**3.MR. MAHESH SHRIHARI KALSEKAR**
Aged 49 years, Indian Inhabitant, residing at Flat No. A-104, Mahendra Splender, LBS Road, opp. Neptune Magnet Mall, Bhandup, Mumbai 400 078
**4. MS. SWATI SHRIHARI KALSEKAR alias MRS. SWATI NARAYAN GADKAR**
Aged 46 years, Indian Inhabitant, residing at Flat No. A-104, Mahendra Splender, LBS Road, opp. Neptune Magnet Mall, Bhandup, Mumbai 400078
....Applicants

WHEREAS the Applicants above named have filed the present application for the grant of the Heirship Certificate, in respect of the said Premises and more particularly described in the schedule hereunder, left by die deceased Late Mr. Shrihari Rajaram Kalsekar who expired at Mumbai, on 15 th November 2016.

AND WHEREAS if any person is/are having any right, title, interest and/or benefit etc., in the schedule said Premises and, is/are hereby invited to submit his/her/their objection in this court within the period of 30 days from the date of the publication of this public notice.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

Flat No. 805, on the 8th Floor, admeasuring about 68.03 sq. mtrs, built up area, building known as "National Marval", lying being and situate at Plot No.177, Sector-17, Ulwe, Navi Mumbai, Taluka-Panvel, District-Raigad, within the jurisdiction of Panvel Municipal Corporation, 50% ownership and standing in the name of Late Mr. Shrihari Rajaram Kalsekar.

As Such if nothing is received within the stipulated period of 30 days from the date of the publication of this public notice, the application of the applicants shall be allowed and the heirship certificate as prayed for shall be granted.

Given my hands and seal of this court on this 17 June, 2021

sd/-
Jr.clerk
Civil Court, Panvel

Court Seal

sd/-
Superintendent
Civil Court, Panvel


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## महसूल राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे महसूल, ग्रामविकास, बंदरे, खारजमिनी व विशेष सहाय्य राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे–



शुक्रवार दि.१८ जून २०२१ रोजी सकाळी ०८.३० वा. सुरुची निवासस्थान येथून पनवेल मार्गे माणगावकडे प्रयाण. सकाळी ११.३० वा. शासकीय विश्रामगृह, माणगाव येथे आगमन व राखीव. दुपारी १२.३० वा. तळा, माणगाव, श्रीवर्धन व रोहा या तालुक्यातील विविध विकास कामे व अडीअडचणीबाबत बैठक. स्थळ:– प्रशासकीय भवन, माणगाव. सोईनुसार शासकीय विश्रामगृह माणगावकडे प्रयाण, आगमन राखीव. दुपारी १.३० वा. शासकीय विश्रामगृह माणगाव येथून ताम्हिणी घाट मार्गे पुणेकडे प्रयाण.

## पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे–



शुक्रवार, दि.१८ जून २०२१ रोजी सकाळी ०८.०० वा. सुनिती शासकीय निवासस्थान येथून शासकीय वाहनाने दस्तुरी माथेरानकडे प्रयाण. सकाळी ११.०० वा. दस्तुरी माथेरान येथे आगमन व अश्व लसीकरण कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ : एम.टी.डी.सी. विश्रामगृह, दस्तुरी, माथेरान. सकाळी ११.४५ वा. दस्तुरी येथून माथेरानकडे प्रयाण. दुपारी १२.३० वा. माथेरान येथे आगमन व माथेरान गिरिस्थान नगरपरिषद विकास कामांचा आढावा. स्थळ : माथेरान गिरिस्थान नगरपरिषद कार्यालय. दुपारी २.०० ते ३.०० वा. राखीव. दुपारी ३.०० वा. माथेरान येथून मिनी ट्रेन ने अमन लॉजकडे प्रयाण. दुपारी ३.४० वा. अमल लॉज, माथेरान येथे आगमन व शासकीय वाहनाने सुतारवाडी ता.रोहाकडे प्रयाण. सायं. ६.३० वा. सुतारवाडी येथे आगमन व राखीव. प्रयाण.

# जुन्या पोलीस ठाण्यासमोरील तपासणी नाक्यामुळे पोलादपूर ते चोळईपर्यंत वाहतुककोंडी

### तपासणी नाका की अंडरपासमध्ये वाहने कोसळण्यापासून बचाव यंत्रणा?

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**



मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर पोलादपूर शहरातील चौपदरीकरण अंडरपास पध्दतीचे बॉक्सकटींग करून सुरू असून एलॲण्डटी ठेकेदार कंपनीने पावसाळ्यापूर्वी सुरू केलेल्या या कामामुळे पोलादपूर शहरा–तील महामार्गावरील वाहतूककोंडी सध्या वाढत आहे. चोळई येथे महामार्गावरून वाहनचालकांना पोलादपूरमध्ये शिरल्यानंतर पूर्वेकडील सर्व्हिसरोडवरून मार्गक्रमण करावे लागत आहे. अशातच, पोलादपूरच्या जुन्या पोलीस ठाण्यासमोरील तपासणी नाक्याजवळ वाहनांची तपासणी होण्याऐवजी जपून मार्गक्रमण करण्याच्या सुचना दिल्या जात असून हा तपासणी नाका आहे की अंडरपासमध्ये वाहने कोसळण्यापासून बचाव यंत्रणा, असा प्रश्न सद्यस्थितीत उद्‌भवला आहे.

रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी पोलादपूर येथील महामार्गाची पाहणी करण्यासाठी केलेल्या दौऱ्यामध्ये पोलादपूर शहरातील पश्चिमेकडील सर्व्हिसरोड सुरू करण्यासंदर्भात होणारे अडथळे दूर करण्याबाबत पोलीस बळाचा वापर करण्याच्या सुचना प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांना दिल्या होत्या. यानंतर पोलादपूर शहरामध्ये कोरोना संसर्ग पार्श्वभूमीवर जिल्हा राखीव पोलीसांच्या दंगलनियंत्रक पथकातील ३४ कर्मचाऱ्यांची प्लॅटून मागवून करून पोलादपूरच्या जुन्या पोलीस ठाण्यासमोर रत्नागिरी व सातारा जिल्हाहद्द तपासणी नाका सुरू करण्यासाठी तैनात करण्यात आली. यानंतर एक टँकर पोलादपूर पंचायत समितीसमोरील अंडरपास रस्त्यावर कलंडल्याने अपघात झाला होता.

सध्या गेल्या दहा दिवसांपासून वाहनांना अडवून चौकशी करण्याचे काम पोलादपूर येथील जुन्या पोलीस ठाण्यासमोर छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या मुंबई दिशेने सुरू आहे. अशातच, गेल्या पाच दिवसांपासून अतिवृष्टीचा इशारा हवामान खात्याने दिल्यानंतर दोन दिवसांपासून रोज अधूनमधून जोरदार पर्जन्यवृष्टी होऊ लागली आहे. त्यामुळे याच राखीव पोलीसांच्या दंगलनियंत्रक पथकातील ३४ कर्मचाऱ्यांच्या प्लॅटूनला पूर्वेकडील सर्व्हिसरोडवरून वाहतूक करणाऱ्या वाहनांना नियंत्रित करण्याचे कामही करावे लागत असून यामुळे वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणावर झालेली दिसून येत आहे.

पश्चिमेकडील सर्व्हिसरोडचे काम काही लोकांनी भूसंपादनाचा मोबदला घेऊनही ताबा न सोडल्याने अद्याप रखडले असून यामुळे पूर्वेकडील सर्व्हिसरोडवर वाहतूकीची कसरत मोठ्या प्रमाणात सुरू आहे. परिणामी, पोलादपूरच्या पंचायत समितीसमोरून छ.शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला वळसा घालून सडवली फाट्यापर्यंत चोळई गावाच्या हद्दीत वाहनांची एकेरी रांग खुप वेळा सुमारे दोन कि.मी.अंतरापर्यंत सुरू उभी राहात आहे. केंद्रसरकारच्या भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने टोलनाक्यावर १०० मीटरपर्यंत रांगा असल्यास रांगेतील सर्वांना टोल न घेताच पुढे जाऊन देण्याचा निर्णय झाला असला तरी पोलादपूर येथील तपासणी नाक्याबाबत हा नियम लागू नसल्याचे दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांपासून याठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा उभ्या राहून पुढील वाहने पुढे सरकल्यानंतर मार्गाक्रमण करीत असल्याचे दिसून येत आहे. या वाहनांमध्ये महाकाय कन्टेनर्स व टँकर्सचा समावेश असल्याने बॉक्सकटींगचे खंदक असलेला महामार्गाचा मध्यभाग कमकुवत होऊन सर्व्हिसरोड पावसाच्या पाण्याने ठिसूळ व कमकुवत होऊन खंदकात महाकाय वाहनांसह कोसळून अपघात होण्याची शक्यता वाढीस लागली आहे.

पोलादपूर शहरातील चौपदरीकरणासंदर्भात काही भूसंपादित लोकांच्या असहकारामुळे प्रशासन हतबल झाले असून नजिकच्या काळात पश्चिमेकडील सर्व्हिसरोडचे काम तातडीने पूर्णत्वास न गेल्यास पोलादपूरच्या कशेडी घाटात दरडी कोसळण्यापूर्वीच पोलादपूर शहरातील अंडरपास रोडच्या बॉक्स कटींगसाठी खोदलेल्या खंदकात अतिअवजड वाहतूकीमुळे पुर्वेकडील सर्व्हिसरोड ढासळण्याची चिन्हे दिसून येत आहेत. एलॲण्डटी ठेकेदार कंपनीने पावसाळ्यापूर्वी सुरू केलेल्या या नियोजनशून्य कामामुळे हा प्रकार घडला आहे.

## जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत जिल्हास्तरीय योजनांना स्वतंत्र लेखाशिर्ष मिळविण्यात पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांना यश

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत जिल्ह्याच्या विविध विकास कामांना मूर्त स्वरूप देण्याचे काम केले जाते. मात्र काही जिल्हास्तरीय योजनांसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उपलब्ध नसल्याने या योजनांचे काम गतीने पूर्ण करण्यात तसेच या जिल्हास्तरीय योजनांसाठी शासन स्तरावरून निधी देण्यातही तांत्रिक अडचणी उद्‌भवतात.

या बाबींचा सखोल अभ्यास करून पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी वित्त व नियोजन विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविला आहे. आता रायगड जिल्ह्या–तील जिल्हास्तरीय योजनांसाठी नियोजन विभागाने प्राथमिक शाळेच्या इमारत बांधकामासाठी जिल्हा परिषदेला अनुदान, प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्राची देखभाल व दुरुस्ती, वन्य प्राण्यांनी केलेल्या पिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई, शासकीय निवासी इमारती, ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम व विस्तारीकरण करणे, शासकीय रुग्णालयांकरिता यंत्र सामुग्री व साधन सामुग्री खरेदी या जिल्हास्तरीय योजनांसाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्यास शासनाची मान्यता मिळाली आहे.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य सचिव या नात्याने जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी शासनाकडे पाठविला होता. या जिल्हास्तरीय योजनांना स्वतंत्र लेखाशिर्ष मिळाल्यामुळे जिल्ह्यातील विकास कामांना निश्चितच गती मिळणार आहे.

## तळोजा पोलिस करणार जप्त ट्रॉल्यांचा लिलाव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चोरीच्या गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या ४ ट्रॉल्यांची ओळखपत्रे मूळ मालकाने तळोजा पोलिस ठाण्यात आणण्याचे आवाहन करण्यात आले होते. परंतु त्याला प्रतिसाद न मिळाल्याने सदर ट्रॉल्यांचा लिलाव करण्यात येणार आहे.

तळोजा पोलिस ठाण्यात चोरीच्या गुन्ह्यात एकूण चार ट्रॉल्या जप्त करण्यात आलेल्या होत्या. सदर ट्रॉल्यांचे मूळ मालकांचा शोध घेतला असता परंतु ते मिळून येत नाही. सदरच्या ट्रॉल्या तळोजा पोलिस ठाण्याच्या आवारात पडून आहेत. त्यांचे मूळ मालक मिळून येत नसल्याने प्रत्यक्ष लिलाव प्रक्रीया केली जाणार आहे. दि.२४.०६.२०२१ रोजी हि लिलाव प्रक्रिया होणार असून त्यासाठी इच्छूकांनी तत्पूर्वी तळोजा पोलिस ठाण्याचा दुरध्वनी क्र.–०२२२७४१२३३३ वर संपर्क साधावा असे आवाहन पोलिस निरीक्षक (गुन्हे) संजय नाळे यांनी केली आहे.

# कायम स्वरूपी नोकरीत सामावून न घेतल्यास बेमुदत उपोषण

### स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीचा जिल्हाधिकाऱ्यांना इशारा

**दै.रायगड नगरी । वाकण**



नागोठणे येथील रिलायन्स कंपनी परिसरातील शेतकऱ्यांची जमिनी शासनाने महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ यांच्या वतीने अत्यंत माफक भावात संपादित करून केंद्र शासनाच्या आयपीसिएल सध्याच्या रिलायन्स इंडस्ट्रीज या कारखान्यासाठी दिल्या. त्यावेळी झालेल्या बैठकीत दाखले धारक प्रकल्पग्रस्तांना कंपनीत कायमस्वरूपी नौकरी देण्याचे ठरले असताना आजतागायत बरेच दाखले धारक प्रकल्पग्रस्त नोकरी पासून वंचित असून २५ एप्रिल १९९० रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार जिल्हाधिकारींनी आम्हा प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नोकरी मिळवून न दिल्यास २९ जून २०२१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग समोर बेमुदत उपोषणास बसणार असल्याचा इशारा स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिका–यांना एका निवेदनामार्फत देण्यात आला आहे. दरम्यान संघर्ष समितीचे अध्यक्ष किशोरभाई म्हात्रे, सचिव प्रह्लाद पारंगे, संघटक गोरखनाथ पारंगे, खजिनदार मनोज पारंगे आदी पदाधिकारींनी अलिबाग विधानसभा मतदार संघांचे आमदार महेंद्र दळवी यांची भेट घेऊन न्याय मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे अशी विनंती केली आहे.

स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिका–यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, २५ एप्रिल १९९० च्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार उर्वरित प्रकल्पग्रस्तांना नागोठणे येथील रिलायन्स कंपनीत कायम स्वरूपी नौकरीत सामावून घेणे कामी रिलायन्स व्यवस्थापन व स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती यांची संयुक्त बैठक आयोजित कारण्यासंदर्भात आपणास निवेदन देण्यात आले होते. परंतु वारंवार विनंती करूनही आपण आमच्या मागणीकडे दुर्लक्ष केले त्यामुळे आमची मागणी पूर्ण न झाल्याने स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती वरवठणे ते चोळे यांच्या वतीने सर्व प्रकल्पग्रतांसह २९ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसणार आहोत. तरी आपण या सर्व बाबींवर योग्य तो विचार विनिमय करून हा प्रश्न सोडविण्याकामी आम्हास सहकार्य करावे अशी विनंती शेवटी निवेदनामार्फत करण्यात आली आहे.

## कळंब परिसरातील शेतकऱ्यांना कृषीविभागाकडून बियाण्यांचे वाटप

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुका कृषी विभागाकडून कळंब व परिसरातील गावातील शेतकऱ्यांना त्याच्या शेताच्या बांधावर जाऊन तूर, व नाचणीच्या बियाणे तसेच जैविकखताचे वाटप केले. तालुका कृषी विभाग शेतकऱ्यांनसाठी विविध योजना राबवत आहेत. यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना भातशेती बरोबरच शेताच्या बांधावर तुरीची लागवड करून तुरीचे पीक घेऊन आपले उत्पन्न वाढवण्यासाठी गुरुवार दिनांक १७ जून ला कृषिअधिकारी, कर्मचाऱ्यांनी कळंब परिसरातील वारे, तात्यांचीवाडी, बोरीचीवाडी, सुतार पाडा, मानकीवली, कुरुंग, जांभुळवाडी, या गावांना भेटी देऊन प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना तुरीच्या पिक लागवडी विषयी मार्गदर्शन केले व त्यांना तुरीचे तसेच नाचणीच्या बियाणांच वाटप केले. यांसह अज्योतो बायर या जैविकखताचे ही यावेळी वाटप करण्यात आले. यावेळी कृषी पर्यवेक्षक सचिन केणे, मंडळ कृषी अधिकारी प्रवीण जाधव, कृषी सहाय्यक, किरण गंगावणे, माजी सभापती धर्मा निरगुडा, कृषी मित्र रवींद्र चौरे, हरीचंद्र सराई, वारे ग्रामपंचायत सदस्य भास्कर काबडी, लक्ष्मण राणे, सुनील बदे, पांडुरंग बदे, शेतकरी उपस्थित होते.

## रिक्षासह मोटार सायकलीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील लाईन आळी येथील भवानी मोबाईल एस्केसरीजसमोर सुनिल पाटील यांनी त्यांची काळ्या पिवळ्या रंगाची ऑटोरिक्षा क्र.–एमएच ४६ एझेड ४८९० ज्याची किंमत ४५ हजार इतकी आहे. ही उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर रिक्षा चोरून नेली आहे. तर दुसऱ्या घटनेत करंजाडे प्लॉट नं–०३ मंगलमूर्ती कंस्ट्रक्शनच्या कार्यालयासमोर विजय दरेकर यांनी त्यांची ३५ हजारांची काळ्या रंगाची होंडा कंपनीची सीबी युनिकॉर्न गाडी क्र– एमएच ४६ एस ९६७९ हि उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर गाडी चोरून नेली आहे.


ॲड.भुपेश पेमारे

### जाहीर नोटीस

कर्जत येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज १३६/२०२१

श्रीमती.राजेश्री राजेंद्र दरेकर — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक, ग्रामपंचायत वैजनाथ — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती कै.राजेंद्र सदाशिव दरेकर यांचा मृत्यू मौजे वैजनाथ, ता.कर्जत, जि.रायगड येथे ग्रामपंचायत वैजनाथ यांचे हद्दीत दि.०६/०६/२०१९ रोजी झालेला आहे. अर्जदार यांचे पती कै.राजेंद्र सदाशिव दरेकर यांचे मृत्यूची नोंद प्रचलित नियमानुसार एक वर्षाचे आत होणे अनिवार्य होते. मात्र अर्जदाराचे कुटुंबियांचे अज्ञानामुळे व काही कारणास्तव त्यांचे पतीची मृत्यूची नोंद मुदतीत करणेची राहून गेले आहे. त्यामुळे अर्जदारांनी त्यांचे पतीची मृत्यूची नोंद प्रचलित नियमानुसार सामनेवाले यांचे दप्तरी नोंदणी रजिस्टर्डला करून तसा मृत्यू दाखला सामनेवाल्यांनी अर्जदारांना द्यावा असा हुकूम होणेकरिता अर्जदारांनी प्रस्तुतचा चौकशी अर्ज या मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. सबब अर्जदार यांचे अर्जास जर कोणाचीही कसलेही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ही हरकत आमचेकडे लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेवून योग्य वाटल्यास अर्जदारांचे लाभात योग्य तो निर्णय देईल. मागाहून आलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही.

आज दि.१७/०६/२०२१ रोजी आमचे सही शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्याया, कर्जत | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, कर्जत



ॲड.रुपेश बबन गांधिवले

### जाहीर नोटीस

कर्जत येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज १३३/२०२१

ने.ता.१९/०७/२०२१

श्री.कुशा आंबो लोभी — अर्जदार

विरुद्ध

ग्रामविकास अधिकारी

ग्रुप ग्रामपंचायत खांडस — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील कै.आंबो राभा लोभी हे दि.११/०३/१९८४ रोजी मौजे : जांभूळवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. परंतु त्यांची मृत्यूची नोंद सामनेवाले यांचे कार्यालयीन दप्तरी उपलब्ध नसल्याने तसा दाखला अर्जदार यांना दिलेला आहे. मात्र अर्जदार यांना सरकारी व निम्न–सरकारी कामाकरिता कै.आंबो रामा लोभी यांच्या मृत्यूच्या दाखल्याची आवश्यकता आहे. म्हणून अर्जदार यांनी सदरील अर्ज दि.०७/०६/२०२१ रोजी या मा.न्यायालयात दाखल केलेला आहे.

अर्जदार यांना त्यांच्या मागणीप्रमाणे कै.आंबो रामा लोभी यांच्या मृत्यूचा दाखला देणेस कोणाची हरकत असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत हरकत दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांना त्यांच्या मागणीप्रमाणे कै.आंबो रामा लोभी यांचा मृत्यूचा दाखला देणेबाबत योग्य ते आदेश करण्यात येतील याची दखल घ्यावी.

आज दि.१७/०६/२०२१ रोजी माझे न्यायालयाचे सहीशिक्क्याने दिली आहे.

सही/– क.लिपीक फौ.न्याया, कर्जत | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, कर्जत



# ग्रामपंचायत देवद

## ता.पनवेल, जि.रायगड

## जाहीर दरपत्रक सूचना

ग्रामपंचायत देवदसाठी २०२१/२०२२ या सालाकरिता ग्रामपंचायत फंडातून वस्तू खरेदी करावयाच्या आहेत. त्यासाठी मान्यताप्राप्त पुरवठादारांकडून दि.१८/०६/२०२१ ते २४/०६/२०२१ रोजी ५.०० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात जाहीर दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदरचे दरपत्रक दि.२५/०६/२०२१ रोजी सायं.४.०० वाजता निविदाधारक अगर त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

| अ.क्र. | वस्तू/साहित्याचे नाव | लेखाशिर्षक | नग |
|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत कार्यालय आर.ओ.मशीन बसविणे | ग्रामपंचायत निधी | १ |
| २ | दिवाबत्ती साहित्य | ग्रामपंचायत निधी | |
| ३ | ग्रामपंचायत हद्दीत औषध व धुर फवारणीसाठी एजन्सी/ठेकेदारांची नेमणूक करणे | ग्रामपंचायत निधी | |
| ४ | झाडे कटींग मशिन | ग्रामपंचायत निधी | १ |
| ५ | सॅनिटायझर मशिन | ग्रामपंचायत निधी | १ |

अटी व शर्ती :–

१) सर्वात कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा आधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे, त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) काम ज्याच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रुपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे

३) कामाचे ईस्टीमेट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

४) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

५) साहित्याचे व वस्तूचे दर सर्व (व्हॅट टॅक्स इ.) करासहीत पोहोच नमूद करणेचे आहेत. प्राप्त दरापैकी कोणतेही एक दरपत्रक स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

दि.१७/०६/२०२१

सही/– सौ.प्रतिभा पुंडलिक वानखेडकर, ग्रामसेवक, ग्रामपंचायत देवद, देवद, ता.पनवेल, जि.रायगड

सही/– सौ.शितल प्रभाकर सोनावणे, सरपंच, ग्रामपंचायत देवद, देवद, ता.पनवेल, जि.रायगड

# संक्षिप्त...

## सुधागड तालुक्यात बुधवारी ५ कोरोना बाधित रुग्णांची नोंद; एकाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात बुधवारी (ता.१६) ५ कोरोना बाधित रुग्णांची नोंद झाली आहे. तर एकाचा मृत्यू झाला असून ८ जणांनी कोरोनावर मात केली आहे. सध्या तालुक्यात कोरोनाचे ९२ सक्रिय रुग्ण आहेत अशी माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली.

तालुक्यात आत्तापर्यंत कोरोनाचे १२५८ रुग्ण झाले असून ११०७ रुग्ण बरे झाले आहेत. आणि तब्बल ५९ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अशी माहिती देखील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी दिली आहे. नागरिकांनी शासन नियमांचे पालन करून योग्य खबरदारी व काळजी घ्यावी आणि घाबरून जाऊ नये असे आवाहन डॉ. शशिकांत मढवी यांनी केले आहे.

## उरणमध्ये पावसाची दमदार सुरुवात

**दै.रायगड नगरी । उरण**

गेले काही दिवसांपासून उरणमध्ये पावसाने जोरदार सुरुवात केली आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे हवेत गारवा आला आहे. यामुळे जनतेत समाधान व्यक्त केले जात आहे.

जून महिन्याच्या सुरुवातीपासून वादळी पावसाळा सुरुवात झाली. तेव्हापासून पावसाचा जोर दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. यामुळे गर्मीने हैराण झालेल्या जनतेला सतत पडणाऱ्या पावसामुळे हवेत गारवा आल्याने दिलासा मिळाला आहे.

गेली काही वर्षे जून महिना संपत आला तरी पावसाचा पत्ता नसतो मात्र यावेळी तौका वादळाने तडाखा देत पावसाळा सुरुवात केली आहे. गेले दोन ते तीन दिवसांपासून पावसाने जोर पकडला आहे. जरी वातावरण गार झाले असले तरी अचानक आलेल्या पावसाने जोर कायम ठेवल्याने जनजीवन मात्र विस्कळीत झाले आहे.

सतत पडणाऱ्या पावसामुळे उरण पतीसरातील रस्त्यांची अवस्था बिकट होत खड्ड्यांचे साम्राज्य पसरल्याचे चित्र पहावयास मिळते. पडणाऱ्या पावसामुळे तालुक्यातील काही ठिकाणची अवस्था बिकट असून छोटा-मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी प्रशासनाने याची खबरदारी घेऊन उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



# पक्ष बांधणीसाठी शिवसेनेच्या महिला आघाडीचा पुढाकार

**दै.रायगड नगरी । माथेरान**

नगरपरिषदेत शिवसेनेची एकहाती सत्ता स्थापन झाल्यानंतर आजवर केलेल्या विकास कामांचा आढावा जाणून घेण्यासाठी विद्यमान नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये शिवसेनेच्या महिला आघाडीचे चर्चासत्र प्रसादभाई जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आले होते.

यावेळी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्यासह शहर संघटक संगीता जांभळे, उप शहर संघटक समिना महापुळे, संपर्क संघटक प्रीती कळंबे, शलाका शेलार, श्रुतिका दाभेकर, अनिता मोरे, ऐश्वर्या शिंदे, हेमलता कदम, संजना शेलार, रचना सावंत, योगिता चौगुले, अंकिता मोरे, रिझवाना शेख, जुलेखा पटेल, दीपा परब, सुजाता शिंदे, निशा पार्टे, सविता शिंदे, कल्याणी शिंदे, जयश्री कदम, सविता कारंडे, सुहासिनी शिंदे आदी महिला मोठया प्रमाणावर उपस्थित होत्या.



आगामी निवडणुका लक्षात घेऊन आणि आपल्या पक्षाच्या माध्यमातून आजवर केलेली विविध भागांतील विकास कामे आणि प्रलंबित कामे या सर्व बाबींचा आढावा घेऊन सविस्तरपणे चर्चा करण्यात आली. पक्ष संघटन आजही मजबूत असून गावाच्या विकासाच्या दृष्टीने नेहमीच सकारात्मक विचार करत गावाच्या हिताची विकासात्मक कामे पूर्ण करण्यासाठी शिवसेना आगेकूच करीत आहे.त्यामुळे येत्या निवडणुकीच्या कालखंडात प्रत्येक प्रभागातील नागरिकांना भेडसावत असलेल्या अडीअडचणी, समस्या यांचे प्रामुख्याने निराकरण करण्यासाठी प्रत्येक प्रभागात महिला विभाग प्रमुख आणि त्या त्या भागातील शिवसेनेच्या सदस्या आणि अन्य सर्वसामान्य महिला वर्ग यांची एक वैचारिक बैठक आणि चर्चासत्र दि.१७ जून पासून सुरू करण्यात येणार आहे. याच माध्यमातून पक्ष बांधणी बरोबर जनतेला अभिप्रेत विकास कामे आणि अनावधानाने काही थोडीफार अपूर्ण असलेली कामे ही प्रगतीपथावर पूर्ण करण्यासाठी विद्यमान नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण केली जाणार आहेत.


प्रत्येक प्रभागातील कामे ही केवळ पाच वर्षांच्या कार्यकाळात पूर्णत्वास जाणे जरी अशक्यप्राय बाब असली तरीसुद्धा यातूनच एक सुवर्णमध्य काढत निवडणूक पूर्वकाळात गावाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शिवसेनेच्या महिला आघाडीने पुढाकार घेतला आहे.प्रत्येक प्रभागात जाऊन तेथील महिला वर्गाशी सुसंवाद साधून छोटेखानी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करीत सर्व महिलांच्या व्यथा अडीअडचणी समस्या जाणून घेण्यासाठी हा एक छोटासा प्रयत्न राहणार आहे. शिवसेनेतील महिला आघाडी आजही एकसंध दिसत असून एक नवा इतिहास घडविण्यासाठी आपल्या गावाला एका नव्या उगमाकडे नेण्यासाठी कटिबद्ध झालेल्या दिसत आहेत. संपर्क कार्यालयात झालेल्या छोटेखानी चर्चा सत्रात एकजुटीने सर्व महिला वर्गाच्या समस्या दूर करण्याचा निर्धार यावेळी केला असून निश्चितच आम्हाला गावांतील महिला वर्ग सकारात्मक प्रतिसाद देतील असा विश्वास यावेळी शहर संघटक संगीता जांभळे, उप शहर संघटक समिना महापुळे, संपर्क संघटक प्रीती कळंबे यांनी व्यक्त केला आहे.यावेळी नागराध्यक्षांचे हस्ते विभागवार नियुक्ती करण्यात आलेल्या महिलांना प्रमाणपत्र देण्यात आले त्यांच्या या वाटचालीसाठी नगराध्यक्षा तथा उत्तम प्रशासक प्रेरणा प्रसाद सावंत यांनी शुभेच्छा दिल्या.

## रानभाज्या ठरत आहेत आदिवासी समाजाचा उदरनिर्वाह

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

गेल्या आठवड्यापासून पावसाने चांगली सुरुवात झाली असून अनेक ठिकाणी हिरवळ मोठ्या प्रमाणावर पसरलेली दिसत आहे. पावसाळ्याच्या दिवसात आदिवासी भगिनी जंगलातील रानभाज्या सर्रासपणे बाजारपेठेत विक्रीसाठी आणतात. या रानभाज्या मध्ये शेवळा, माट, कंटोरली, कुड्याच्या शेंगा, वडीची पाने,व काजू गार आदी प्रकारच्या रानभाज्या कोलाड, रोहा येथील बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी उपलब्ध असून यामुळे आदिवासी समाजाचा उदरनिर्वाहचा प्रश्न सुटलेला आहे.

इतर भाजीपाल्याचे रेट वाढत असतांना रानभाज्याच्या किंमती लोकांना परवडणाऱ्या असल्यामुळे या भाज्यांना वाढती मागणी असल्याचे दिसून येत आहे शेवळाची एक जुडी रुपये १० पासून तर माटाची ही जुडी हि १५ रुपयांपर्यंत उपलब्ध आहे. इतर भाज्यांपेक्षा रानभाज्या अधिक चविष्ट असतात. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात अधिक मोठ्या प्रमाणावर या भाज्यांना मागणी असते.



या रानभाज्या श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणावर विक्रीस येतात. रान भाज्यांमुळे आदिवासी बांधवांना रोजगाराची संधी प्राप्त होत असते.परंतु या भाज्या आणण्यासाठी डोंगर, दऱ्याखोऱ्यात जावे लागते, मेहनत जास्त परंतु खर्च कमी असल्यामुळे या भाज्या कमी किमतीत विकल्या जातात.

## ग्रामपंचायत खैरणे तर्फे कोरोना काळात नागरिकांसाठी राबविलेले विविध उपक्रम





**दै.रायगड नगरी । पनवेल**

संपूर्ण देशात आणि राज्यात कोरोनाने थैमान घातले असताना कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी सर्वच स्तरावर विशेष प्रयत्न चालू आहेत. पनवेल तालुक्यातील खैरणे ग्रामपंचायतीने देखील गावाच्या हितासाठी व सुरक्षिततेसाठी सामाजिक बांधिलकी जपून कोरोना मुक्तीसाठी विविध उपक्रम राबविले.

ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना कोरोना काळात जनजागृती करून मास्क वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे अंगणवाडी सेविका आणि आशा वर्कर यांना थर्मामीटरचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत सदस्यांना देखील नागरिकांच्या आरोग्याबाबत सावधानतेसाठी ऑक्सिमीटरचे वाटप करण्यात आले.

तसेच शासनाच्या अटी व नियमांना अनुसरुन विवाह सोहळ्यासाठी देखील ग्रामपंचायतीतर्फे सॅनिटायझर व मास्कचे वाटप करण्यात आले. ग्रामपंचायत स्तरावर कोरोनामुक्तीसाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांसाठी सरपंच मिनाक्षी हरिश्चंद्र ताम्हणे, उपसरपंच तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी सौ.प्रतिभा वानखेडकर त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीतील कर्मचारी दशरथ माळी, प्रभाकर पाटील, महेश भोपी, धोंडू म्हात्रे, एकनाथ पाटील, नागेश पाटील, महादू पाटील, आरोग्य सेवक पालकर तसेच अंगणवाडी सेविका आणि आशा वर्कर यांचे महत्वपूर्ण सहकार्य लाभले.

## रोह्यातील तरुणांचा मनसे पक्षामध्ये जाहीर प्रवेश

**दै.रायगड नगरी । रोहा**

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रोहा तालुक्यांतील धाटाव येथील तरुण युवकांनी मनसेमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला.

मनसेचा झेंडा हाती घेऊन या तरुण युवकांनी तालुक्यातील गांवा गावांत मनसे मोठया प्रमाणात वाढवणार असल्याचे सांगीतले. आम्हला कोणत्याही राजकीत पक्षाला विरोध करायचा नसून आम्ही आमचे काम कसे चांगले करू ह्या गोष्टी कडे मी व माझे सहकारी लक्ष देणार आहोत असे मनसे दक्षिण रायगड उपजिल्हाध्यक्ष अमोल पेणकर ह्यांनी ह्या वेळी स्पष्ट केले. प्रवेश करणाऱ्या युवकांमध्ये अक्षय रटाटे, दिपक भोकटे, संतोष भोकटे, कुंजन भोकटे, दिपेश जाधव, सुमित फाटक, अक्षय सावंत, जितेश रटाटे, रोहन जाधव, सुरेश मुटके, अक्षय पेटकर, मिकी जाधव, अनिकेत शाल्दुर, विनायक मोरे, प्रफुल चावरेकर, महेश मोहिते, सुमित भिसे, प्रतिक घाग, सिद्धेश तेलंगे, सागर भगत, अजय मुंडे, विनीत कदम, कल्पेश शेळके इत्यादी कार्यकर्त्यांचा समावेश आहे. याप्रसंगी मनसेचे दक्षिण रायगड संपर्क अध्यक्ष दिलीप सांगले, मनसेचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष देवेंद्र गायकवाड, दक्षिण उपजिल्हाध्यक्ष अमोल पेणकर, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष प्रवीण शिंदे, विद्यार्थी सेना तालुका अध्यक्ष साईनाथ धुळे, रोहा शहराध्यक्ष मंगेश रावकर, उपशहराध्यक्ष अमित पवार, विध्यार्थी सेना शहराध्यक्ष विकी दिंडे, मनसे उप शहराध्यक्ष महेश साळुंके, महेश वाडकर, सतीश डाकी, रोशन चाफेकर, राकेश लुमन आदी उपस्थिती होती.



## ई-मेल आयडी हॅक करुन महिलेच्या व्हॉट्सॲपवरुन नातेवाईकांना पाठविले अश्लिल मेसेज ; नवी मुंबई सायबर सेलकडून तपासाला सुरुवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सायबर चोरट्यांनी खारघर भागात राहणाऱ्या एका महिलेचे व तिच्या मुलाचे ईमेल आयडी हॅक करुन त्याद्वारे सदर महिलेच्या व्हॉट्सऍपवरुन त्यांच्या ओळ-खीतील मित्र-मैत्रीण व नातेवाईकांना अश्लिल मेसेज तसेच शिवीगाळ असलेले मेसेज पाठविल्याचा धक्कादायक प्रकार उघडकिस आला आहे. सदर महिलने नवी मुंबई पोलिसांच्या सायबर सेलकडे धाव घेतल्यानंतर पोलिसांनी अज्ञात सायबर चोरटयावर गुन्हा दाखल करुन या प्रकरणाचा पुढील तपास सुरु केला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार महिला आपल्या दोन मुलांसह खारघर येथील बेलपाडा भागात राहाण्यास आहेत. लॉकडाऊनमुळे सध्या त्यांच्या मुलांचे ऑनलाईन क्लासेस सुरु असल्याने त्यांच्या क्लासेससाठी त्या आपल्या ई-मेल आयडीचा वापर करत होत्या. तर त्यांचा मुलगा देखील स्वतःच्या नावाने तयार केलेल्या ई-मेल आयडीचा वापर ऑनलाईन क्लासेससाठी करत होता. या महिलेचे दोन्ही मुले मागील वर्षभर लॅपटॉप व कॉम्फ्युटरवर ई-मेलआयडीचा वापर करुन ऑनलाईन शिक्षण घेतले आहे. मात्र अज्ञात सायबर चोरटय़ांनी गत एप्रिल महिन्यामध्ये या महिलेचे व तिच्या मुलाचे ई-मेल आयडी हॅक करुन त्याच्या माध्यमातून नेटवर्कमध्ये फेरफार केला. तसेच त्याचा गैरवापर करुन सदर महिलेच्या व्हॉट्सऍपवरुन त्यांच्या मित्र-मैत्रिणी व नातेवाईकांना अश्लिल व शिवीगाळ असलेले मेसेज पाठविण्यास सुरुवात केली.

त्यामुळे नातेवाईक व मित्र मैत्रिणींनी या महिलेला संपर्क साधून याबाबत माहिती दिल्यानंतर त्यांना धक्का बसला. त्यांनी त्यातील एक सुद्धा मेसेज पाठविले नसताना, परस्पर त्यांच्या व्हॉट्सऍपवरुन मेसेजेस पाठविण्यात आल्याने त्यांनी याबाबत अधीक माहिती घेतली असता, त्यांचे व त्यांच्या मुलाचे ईमेल आयडी हॅक करुन इंटरनेटचा वापर करुन सदर मेसेज पाठवण्यात आल्याचे त्यांना समजले. त्यामुळे त्यांनी नवी मुंबई पोलिसांच्या सायबर सेलकडे धाव घेतली. सायबर सेलने केलेल्या प्राथमिक तपासात सदर महिलेचा व त्यांच्या मुलाचा ईमेल आयडी हॅक करण्यात आल्याचे तीन व्यक्तींनी सदर महिलेच्या व्हॉट्सऍपवरुन त्यांच्या नातेवाईक व मित्र मैत्रिणींना अश्लिल व शिवीगाळ असलेले मेसेज पाठविल्याचे आढळुन आले. त्यानुसार सायबर सेलने या प्रकरणात अज्ञात सायबर चोरट्यांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात आयटी ऍक्टनुसार गुन्हा दाखल करुन या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

## एनडीआरएफ बेसकॅम्पसाठी मौजे महाड येथील जागा देण्यासाठी दुग्धव्यवसाय विकास विभाग सकारात्मक : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचे वाढते प्रमाण पाहता, येथे एनडीआरएफचे बचावपथक कायमस्वरुपी असावे, अशी राज्यमंत्री तथा पालकमंत्री रायगड कु. आदिती सुनील तटकरे यांची मागणी आहे. त्यानुसार जिल्ह्यातील महाड येथे एनडीआरएफ बेसकॅम्पसाठी आवश्यक सुमारे ५ एकर दुग्धव्यवसाय विभागाची जमीन उपलब्ध करुन देण्यास दुग्धव्यवसाय विभागाने तत्वत: सहमती दर्शविली आहे. याबाबत राज्याचे पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंत्री श्री. सुनील केदार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

कोकण विभागामध्ये विशेषत: रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीमुळे राज्य शासनाने महाड येथे एनडीआरएफ बेसकॅम्प कायमस्वरुपी स्थापित करण्याचा प्रस्ताव पुढील मान्यतेसाठी केंद्र शासनास सादर केला आहे. या लोकोपयोगी व अत्यावश्यक कार्यासाठी दुग्धव्यवसाय विभागाची जागा देण्याबाबत तत्वत: मान्यता देण्यात येणार असल्याचे पालकमंत्री कु.तटकरे यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थितीमुळे अतिवृष्टी होणे, दरड कोसळणे, चक्रीवादळ, त्सुनामी अशा नैसर्गिक आपत्ती प्रवणता या भागात मोठ्या प्रमाणात आहेत. जिल्ह्यातील औद्योगिक विकास, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग व द्रुतगती मार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग, जलमार्ग, रेल्वे मार्गाचे जाळेही मोठ्या प्रमाणात आहे. परिणामी अपघात व आपत्तीजन्य प्रसंगांना येथे तोंड द्यावे लागते. या आपत्कालीन परिस्थितीमध्ये बचाव कार्यासाठी मिळणारा सूवर्ण काळ (Golden Period) अत्यंत महत्त्वाचा असतो. संपूर्ण कोकण विभागाचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या महाड येथील जागेत एनडीआरएफ टीम कायमस्वरूपी तैनात असल्यास बचावकार्यास वेग मिळून जीवितहानी टाळता येऊ शकेल. पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या प्रयत्नातून महाड येथे कार्यान्वित होणाऱ्या एनडीआरएफ पथकामुळे रायगडसह रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यात आपत्कालीन परिस्थितीत घटनास्थळी बचावकार्य जलदगतीने होण्यास मदत होणार आहे.


## ग्रामपंचायत आकुर्ली

ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा

दि.१७/०६/२०२१

सर्व अधिकृत ठेकेदार यांस कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे कामासाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत ठेकेदारांनी दिनांक १८/०६/२०२१ ते दि.२४/०६/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा त्यास दिवशी शक्य झाल्यास दि.२५/०६/२०२१ सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. त्यावेळी उपस्थित रहावे. कोणतीही एक अगर सर्वच निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | इसारा रक्कम १% | निविदा फॉर्म मिळण्याची मुदत | निविदा फॉर्म स्वीकारण्याची अंतिम तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| १ | आकुर्ली स्टॉप २ ते आकुर्ली अंतर्गत रस्त्याच्या बाजूने स्ट्रीट लाईट बसविणे (ग्रामनिधी) | २९०००० | २९०० | दि.१८/०६/२०२१ ते दि.२२/०६/२०२१ | २४/०६/२०२१ दु.३.०० वाजेपर्यंत | |
| २ | किसन पाटील ते राजेश धरणेकर पर्यंत गटार साफसफाई करणे (ग्रामनिधी) | २५००० | २५० | दि.१८/०६/२०२१ ते दि.२२/०६/२०२१ | २४/०६/२०२१ दु.३.०० वाजेपर्यंत | |
| ३ | मेन रस्ता ते राजेश ठाकूर बिल्डींग पर्यंत गटार साफ सफाई करणे (ग्रामनिधी) | २५००० | २५० | दि.१८/०६/२०२१ ते दि.२२/०६/२०२१ | २४/०६/२०२१ दु.३.०० वाजेपर्यंत | |
| ४ | माळीवाडी अंतर्गत साफ सफाई करणे. (ग्रामनिधी) | २५००० | २५० | दि.१८/०६/२०२१ ते दि.२२/०६/२०२१ | २४/०६/२०२१ दु.३.०० वाजेपर्यंत | |

**अटी/शर्ती :-**

१) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२) इसारा रक्कम रोखीत भरावा लागेल.
३) निविदा किंमत नापरतावा समजावी.
४) नियमाप्रमाणे आयकर तसेच इतर कर भरावे लागतील.
५) अधिकृत ठेकेदाराने निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदाराचा विचार केला जाईल.
६) निविदा मंजूर केल्यास रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.
७) ५% सुरक्षा अनामत प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
८) इसारा व सुरक्षा अनामत ९० दिवसांनी कामाचा दर्जा पाहून परत मिळेल.
९) वर्क ऑर्डर प्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास व दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास जबाबदार रहावे लागेल.
१०) वरील अटी मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.

सही/-
श्री.जयेंद्र घनश्याम म्हात्रे
ग्रामसेवक
ग्रामपंचायत आकुर्ली

सही/-
सौ.भारती सचिन पाटील
सरपंच
ग्रामपंचायत आकुर्ली